# महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ

## शुल्क निर्धारण समितीच्या दुसऱ्या सभेचे इतिवृत्त

शुल्क निर्धारण समिती दुसरी सभा गुरुवार दिनांक १३ /०४ /२०२३ रोजी सकाळी ११.३० वा. महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाच्या सभागृहात आयोजित करण्यात आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे सदस्य उपस्थित होते.

| | |
|---|---|
| **१. डॉ. शशिकला वंजारी, माजी कुलगुरू, एस एन डी टी विद्यापीठ** | **- समिती अध्यक्ष** |
| २. श्रीमती प्रेरणा देवधरे, कायदा विशेषज्ञ | - सदस्य |
| ३. सीए तपन आपटे, सनदी लेखापाल | - सदस्य |
| ४. सीए राजेश पाटील, सनदी लेखापाल | - सदस्य |
| ५. श्री विक्रमसिंह यादव, मुख्य वित्त व लेखा अधिकारी<br>महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ | - सदस्य सचिव |

या सभेत उपस्थित असलेल्या सर्व सदस्यांचे स्वागत श्री विक्रमसिंह यादव, मुख्य वित्त व लेखा अधिकारी आणि सदस्य सचिव शुल्क निर्धारण समिती यांनी केले. शुल्क निर्धारण समिती सभेत खाली निर्देशित प्रस्तावांस मा शुल्क निर्धारण समितीने मान्यता दिलेली आहे.

प्रस्ताव क्र १ (अ क्र ०२ /१३०४२३)

**दि २४.०९.२०२२ रोजी शुल्क निर्धारण समितीच्या सभेचे इतिवृत वाचून त्यास मान्यता देणे.**

टीप: दि २४.०९.२०२३ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत सोबत जोडले आहे- **(Annexure -1)**

ठराव:

असा ठराव करण्यात येतो की-

दि २४.०९.२०२२ रोजी झालेल्या शुल्क निर्धारण समितीच्या सभेचे इतिवृत वाचून त्यास मान्यता देण्यात येत आहे.

प्रस्ताव क्र २ (अ क्र ०३/१३०४२३)

**महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठात - प्रवेश प्रक्रियेदरम्यान आणि प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्याने विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात घेतलेला प्रवेश रद्द केल्यास अशा विद्यार्थ्यांनी विद्यापीठाकडे जमा केलेल्या फीचा परतावा करणेसाठी मा. विद्यापीठ अनुदान आयोग (University Grants Commission) यांनी प्रकाशित केलेली फी परतावा नियमावली लागू करणेस मान्यता घेणेबाबत.**

टीप: मा विद्यापीठ अनुदान आयोग (University Grants Commission) यांनी प्रकाशित केलेली फी परतावा करणेसंबंधी प्रचलित नियमावलीची प्रत (Annexure – 2: UGC Notification on Refund of Fees and Non-Retention of Original Certificates, October 2018) मा. फी निर्धारण समितीच्या सभेत सर्व सदस्य यांना देण्यात आली.

ठराव:

**असा ठराव करण्यात येतो की महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठात - प्रवेश प्रक्रियेदरम्यान आणि प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्याने विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात घेतलेला प्रवेश रद्द केल्यास अशा विद्यार्थ्यांनी विद्यापीठाकडे जमा केलेल्या फीचा परतावा करणेसाठी मा. विद्यापीठ अनुदान आयोग (University Grants Commission) यांनी प्रकाशित केलेली फी परतावा नियमावली लागू करण्यास मान्यता देण्यात येत आहे.**

**प्रस्ताव क्र ३ (अ क्र ०४/१३०४२३)**

**महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाने खर्चावर आधारित वार्षिक फी वाढ करणेसंबंधी सादर केलेल्या प्रस्तावास मा फी निर्धारण समितीकडून मान्यता घेणेबाबत.**

टीप: शासकीय नियमानुसार सर्व कर्मचाऱ्यांना वार्षिक वेतनवाढ ३ टक्के देण्यात येते. त्यांचप्रमाणे महागाई वाढ दर वर्षी साधारणतः ७ टक्के असते. यामुळे महागाई भत्ता आणि वार्षिक वेतनवाढ या शीर्षकाखाली पगार खर्च यात साधारणत एकूण १० टक्के वाढ होणार आहे. ह्या बाबींचा विचार करून प्रती वर्षी नवीन प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची १० टक्के फी वाढ करण्याचा प्रस्ताव महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाने मांडलेला आहे.

**Modus operandi:**

a. For those students who will complete the course in stipulated time will have to pay the same amount of fees every year, e.g. If the fees finalized for a specific program during the academic year 2023-24 is Rs.100,000/- per year, then the candidate shall pay Rs.100,000/- per year till the completion of the program.

b. During the next academic year, there shall be rise in fees for those students who had taken the admission to the first year during the academic year 2024-25. The fees shall be 1.1 x Rs.100,000/- =1,10,000/- per year.

c. In this case, the year down student or the student who had taken advantage of multiple entry-multiple exit facilities of one year will have to pay Rs.1,10,000/- for subsequent years of his studies. The fees collected from all those students who are studying in one class shall remain same.

d. Fees for those students, who shall get admitted to the first year during the academic year 2025-26 shall be 1.1 x Rs.1,10,000/- = Rs.1,21,000/-. The fees shall remain constant for four years (till the completion of studies in stipulated time).

e. The procedure shall continue for subsequent years.

f. The proposal for the finalization of fees for only the newly established programs during each academic year shall be put before the Hon'ble Fees Fixation Committee.

g. The proposal for the fixation of fees of those programs for which fees is already approved shall not be put for the re-approval of the Hon'ble Fees Fixation Committee.

**ठराव: असा ठराव करण्यात येतो की-**

**महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाने खर्चावर आधारित वार्षिक फी वाढ करणेसंबंधी सादर केलेल्या प्रस्तावास मा फी निर्धारण समितीकडून मान्यता देण्यात आली आहे.**

| | |
|---|---|
| प्रस्ताव क्र. (०५/१३०४ २३ | महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये नवीन सुरू होत असलेल्या विविध अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक फी, परीक्षा फी, गुणपत्रिका फी, ऑडिट आणि अनिवार्य नॉन -क्रेडिट अभ्यासक्रम परीक्षा फी, पासिंग सर्टिफिकेट फी, एक्जिट सर्टिफिकेट फी, केंद्रीय मूल्यमापन प्रकल्प फी, प्रोजेक्ट फी, ओ जे टी मूल्यमापन फी आणि परीक्षा आवेदन पत्र फी आकारणेसाठी मा फी निर्धारण समितीची मान्यता घेणेबाबत. |

| Sr. No. | Program | Total number of credits assigned | Charges per credit | Total proposed Fee for the Program | Duration of the program | Proposed Fee per annum |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | BTech | 162 | Rs.2716/- | Rs.4,40,000/- | 04 Years | Rs.1,10,000/- |
| 2 | MTech | 114 | Rs.1860/- | Rs.2,12,000/- | 02 Years | Rs.1,06,000/- |
| 3 | MBA | 114 | Rs.3509/- | Rs.4,00,000/- | 02 Years | Rs.2,00,000/- |
| 4 | BBA-Retail | 162 | Rs.864/- | Rs.1,40,000/- | 04 years | Rs.35,000/- |
| 5 | BBA-BFSI | 162 | Rs.1728/- | Rs.2,80,000/- | 04 Years | Rs.70,000/- |
| 6 | BBA-Hospitality | 162 | Rs.1235/- | Rs.2,00,000/- | 04 Years | Rs.50,000/- |
| 7 | Bachelors in Wellness Management | 162 | Rs.741/- | Rs.1,20,000/- | 04 Years | Rs.30,000/- |
| 8 | Bachelors in healthcare management | 162 | Rs.741/- | Rs.1,20,000/- | 04 Years | Rs.30,000/- |
| 9 | BA | 162 | Rs.493/- | Rs.80,000/- | 04 Years | Rs.20,000/- |

| | Examination form fees | Examination Fees for Theory and Laboratory courses | Marksheet Fees (Once per performance) | Audit and mandatory non-credit course exam fee | Passing Certificate Fees / Exit Credit Certificate Fee | CAP Fees | Project Fee (If applicable) | OJT Assessment Fee (If applicable) | Exam form late Fees |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **UG Engineering** | 50 | Rs 50 per credit | 150 | Rs. 100 | 200 | 200 | Rs 200 per credit | Rs 250 per credit | 150 |
| **PG Engineering** | 50 | Rs 50 per credit | 150 | Rs. 100 | 200 | 200 | Rs 200 per credit | Rs 250 per credit | 150 |
| **UG Management** | 50 | Rs 50 per credit | 150 | Rs. 100 | 200 | 200 | Rs 200 per credit | Rs 250 per credit | 150 |
| **PG Management** | 50 | Rs 50 per credit | 150 | Rs. 100 | 200 | 200 | Rs 200 per credit | Rs 250 per credit | 150 |
| **UG Arts** | 50 | Rs 50 per credit | 150 | Rs. 100 | 200 | 200 | Rs 200 per credit | Rs 250 per credit | 150 |
| **PG Arts** | 50 | Rs 50 per credit | 150 | Rs. 100 | 200 | 200 | Rs 200 per credit | Rs 250 per credit | 150 |
| **UG IDS** | 50 | Rs 50 per credit | 150 | Rs. 100 | 200 | 200 | Rs 200 per credit | Rs 250 per credit | 150 |
| **PG IDS** | 50 | Rs 50 per credit | 150 | Rs. 100 | 200 | 200 | Rs 200 per credit | Rs 250 per credit | 150 |
| | **Miscellaneous** | Fees for the Degree Certificate: Rs.385/-<br>Eligibility Fees: Rs.750/- | | | | | | | |

ठराव:

असा ठराव करण्यात येतो की

महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये नवीन सुरू होत असलेल्या विविध अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक फी, परीक्षा फी, गुणपत्रिका फी, ऑडिट आणि अनिवार्य नॉन -क्रेडिट अभ्यासक्रम परीक्षा फी, पासिंग सर्टिफिकेट फी, एक्जिट सर्टिफिकेट फी, केंद्रीय मूल्यमापन प्रकल्प फी, प्रोजेक्ट फी, ओ जे टी मूल्यमापन फी आणि परीक्षा आवेदन पत्र फी आकारणेसाठी मा फी निर्धारण समितीची मान्यता देण्यात आली आहे.

मा फी निर्धारण समितीने वर निर्देशित फी व्यतिरिक्त रु २०/- प्रती विद्यार्थी प्रती वर्ष आपत्कालीन सुरक्षा निधी घेण्यात यावी अशी सूचना केली. ही सूचना मान्य करण्यात आली.

सदस्य सचिव
फी निर्धारण समिती

मा अध्यक्ष
फी निर्धारण समिती